# (परिशिष्ट – क)

## लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी कार्यपध्दती.

सदर धोरणान्वये राज्यातील २५ मे.वॅ. क्षमतेपर्यंत सर्व प्रकारचे लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्पास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी ४०० मे.वॅ. क्षमतेचे लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्प विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

१. लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी जल संपदा विभागाकडून प्रकल्प स्थळाचे वाटप आणि प्रकल्पाची मंजुरी देण्यात येत असून सदर प्रकल्पांना संबंधित विभागाचे धोरण लागू राहील.

२. मूलभूत सुविधा संमती - प्रकल्पास महावितरण/महापारेषण कंपनीकडून पारेषण जोड संमती प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पधारकाकडून मूलभूत सुविधा संमती मिळण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे साक्षांकित (Attested) कागदपत्रे विहित केलेल्या शुल्कासह महाऊर्जाकडे सादर करावीत.

(अ) प्रकल्पास महावितरण/महापारेषण कंपनीकडून मिळालेली पारेषण जोड संमती

(ब) सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report)

(क) प्रकल्प अहवाल मंजुरीचे संबंधित संकल्प चित्र कार्यालयाचे पत्र

(ड) जल संपदा विभागासोबत झालेला प्रकल्प विकसन करार

(इ) महाऊर्जा कार्यालयाने विहित केलेले नोटराईज्ड हमीपत्र

२.१ सदर धोरणांतर्गत निश्चित केलेल्या ४०० मे.वॅ. क्षमतेच्या उद्दीष्टांपर्यंत मूलभूत सुविधा संमती मर्यादित ठेवण्यात येईल.

२.२ मूलभूत सुविधा संमती शुल्क :- मूलभूत सुविधा संमती शुल्क रू. १ लाख प्रति मे.वॅ. याप्रमाणे महाऊर्जा कार्यालयाकडे धनाकर्षाद्वारे जमा करावे. सदर धनाकर्ष महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांच्या नावे देय असावा.

प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांचेकडून लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी मूलभूत सुविधा संमतीकरीता आवश्यक ती कागदपत्रे व शुल्क यासह प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची छाननी महाऊर्जा कार्यालयाकडून करण्यात येईल.

याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर प्रस्ताव परिपूर्ण असल्यास प्रकल्पधारकास मा. अध्यक्ष, महाऊर्जा यांच्या मान्यतेने महाऊर्जा कार्यालयाकडून मूलभूत सुविधा संमती देण्यात येईल.

२.३ शासन निर्णय दि. १४-१०-२००८ व ३०-०८-२०१४ अन्वये जाहीर केलेल्या अपारंपरिक ऊर्जा धोरणानुसार मूलभूत सुविधा संमती देण्यात आलेल्या लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्पांना त्या धोरणातील तरतुदी लागू असून नवीन धोरणानुसार पुन्हा मूलभूत सुविधा संमती घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

प्रकल्प कार्यान्वित झाल्याची नोंद:--

३. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर संबंधित वीज वितरण कंपनीचे प्रकल्प कार्यान्वित झाल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी महाऊर्जा कार्यालयास सादर करावे. यानंतर प्रकल्प कार्यान्वित झाल्याची नोंद महाऊर्जाकडे करण्यात येईल.

४. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेची परवानाधारक कंपनी / एसएलडीसी (SLDC) यांच्याकडून प्रमाणित केलेली वार्षिक (आर्थिक वर्षनिहाय) माहिती महाऊर्जाकडे सादर करणे आवश्यक आहे.

५. लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणीपूर्वी व उभारणीनंतरच्या आवश्यक त्या सर्व कायदेशीर व वैधानिक बाबींची पूर्तता प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी करणे आवश्यक आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या सर्व परवानग्या, संमतीपत्रे व ना-हरकत प्रमाणपत्रे संबंधित विभागाकडून परस्पर प्राप्त करून घेणे तसेच संबंधित विभागांच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्रकल्प विकासक व प्रकल्पधारक यांची राहील. त्याबाबतचे व अन्य बाबींचा समावेश असलेले महाऊर्जाने विहित केलेले हमीपत्र / हमीपत्रे प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी सादर करावीत.

६. निष्कासन व्यवस्थेचा खर्च:-

निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापोटी देय असलेल्या अर्थसहाय्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी / महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने मंजूर केलेले अंदाजपत्रक आणि त्यांनी प्रमाणित केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यांपैकी जी कमी असेल ती रक्कम परंतु कमाल मर्यादा रु.१ कोटी प्रति प्रकल्प निष्कासन व्यवस्थेचा खर्च म्हणून गृहित धरण्यात येईल.

अर्थ सहाय्य :-

६.१ लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी प्रकल्प विकासकाने / प्रकल्पधारकाने स्वखर्चाने उभारलेल्या निष्कासन व्यवस्थेसाठी प्रति प्रकल्प कमाल रु.१ कोटी एवढी रक्कम अर्थसहाय्य म्हणून महाऊर्जाकडून प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांना हरित ऊर्जा निधीमधून निधीच्या उपलब्धतेनुसार परतावा स्वरूपात देण्यात येईल.

सदर परतावा संबंधित परवानाधारक वीज वितरण / वीज पारेषण कंपनीस निष्कासन व्यवस्था हस्तांतरित केल्यानंतर हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

७. भांडवली अनुदान:-

लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्पांना भांडवली अनुदान देय राहील. सदर भांडवली अनुदान रु.५०,०००/- प्रति कि.वॅ. प्रमाणे परंतु कमाल रु. १ कोटी प्रति प्रकल्प याप्रमाणे देण्यात येईल.

७.१ सदर भांडवली अनुदान प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्याचे व वीज पारेषित होत असल्याचे संबंधित परवानाधारकाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकास महाऊर्जाकडून हरित ऊर्जा निधीमधून निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येईल.

८. या धोरणांतर्गत कार्यान्वित केलेल्या लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्पांना धोरणामध्ये नमूद केलेल्या रोजगार आणि सामाजिक जबाबदारी विषयक तरतुदी लागू आहेत. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकाने स्थानिक ग्रामपंचायतीकडे दरवर्षी (आर्थिक वर्ष) सादर करावी. तसेच जिल्ह्याची संकलित माहिती जिल्हा परिषदेने महाऊर्जाकडे प्रत्येक वर्षाअखेर (आर्थिक वर्ष) सादर करावी.

********